आदिवासी उपयोजने अंतर्गत पाडाळणे ता.अकोले जि.अहमदनगर येथे ३३ केव्ही उपकेंद्र उभारणी करिता प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१९/प्र.क्र.३९/ऊर्जा-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १९ सप्टेंबर, २०१९.

संदर्भ :- महावितरण कंपनीचे पत्र क्र. SE/ANRC/TECH/४८२८ दि. २३/०३/२०१८.

<u>प्रस्तावना</u> :

अकोले, जि. अहमदनगर हा आदिवासी व दुर्गम तालूका असून वाडयां-वस्त्यांमध्ये विखुरलेला आहे. सद्यस्थितीत राजुर येथील उपकेंद्रातून पाडाळणे, ता. अकोले या भागात वीज पुरवठा केला जातो. उपकेंद्रापासून सदरचे अंतर जास्त असल्याने वीज गळती होत असते, त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना अनियमित भारनियमनाचा त्रास सहन करावा लागतो. अकोले तालुक्यातील ग्राहकांना अखंडीत व योग्य दाबाने वीजपुरवठा होणेकरिता पाडाळणे येथे वीज उपकेंद्र उभारणे आवश्यक आहे. या भागात विद्युत उपकेंद्रा अभावी तेथील विद्युत पुरवठा हा नेहमी खंडीत होणे व कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने तेथे वीज उपकेंद्र उभारणी करणे आवश्यक आहे.

२. महावितरण कंपनीने दि. २३/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर उपकेंद्राच्या उभारणीकरिता तांत्रिक मान्यता दिली असून आदिवासी विकास विभागानेही या उपकेंद्राच्या उभारणीकरिता लागणारा निधी आदिवासी उपयोजनेतून राज्यस्तरीय योजनेअंतर्गत उपलब्ध करून देण्याबाबत मान्यता दिली आहे.

३. पाडाळणे येथे ३३/११ केव्ही उपकेंद्र उभारल्यास ७ गावांतील ९१० कृषीपंप ग्राहकांना तसेच १७३० घरगुती, वाणिज्य व औद्योगिक व पथदिव्यांना योग्य दाबाने अखंडीत व शाश्वत वीजपुरवठा होईल.

उपरोक्त बाबी लक्षात घेता पाडाळणे ता.अकोले या ठिकाणी आदिवासी उपयोजनेमधून राज्यस्तरीय योजने अंतर्गत उपकेंद्र उभारण्याकरिता प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

१. पाडाळणे ता.अकोले या आदिवासी उपयोजना क्षेत्राअंतर्गत असलेल्या ठिकाणी ३३/११ केव्ही, ५ एमव्हीए क्षमतेचे वीज उपकेंद्र उभारण्याकरिता रुपये २९१.७०८ लाख इतका निधी आदिवासी उपयोजनेमधून राज्यस्तरीय योजने अंतर्गत उपलब्ध करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. या योजनेसाठी होणारा खर्च मंजूर व अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदीनूसार पुढील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक टी - ५
२८०१, वीज
८०, सर्वसाधारण, ७९६, जनजाती क्षेत्र योजना
(०२) जनजाती क्षेत्र उपयोजना,
(०१) (०३) महाराष्ट्र राज्य वीज वितरण (२८०१ ५०८९)
कंपनी मर्यादित यांना अनुदान
(राज्यस्तरीय योजना) (कार्यक्रम)
३५, भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान

३. उपरोक्त निधी उपकेंद्र उभारणीच्या कामाच्या आवश्यकतेनूसार व निधीच्या उपलब्धतेच्या मर्यादेत टप्प्याटप्प्याने महावितरण कंपनीस आदिवासी विकास विभागाकडून देण्यात यावा.

४. सदर योजना राबविताना ऊर्जा विभागांतर्गत संबंधित क्षेत्रिय कार्यालयाने आदिवासी विकास विभागाचे संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेशी समन्वय साधावा. तसेच प्रकल्प अंमलबजावणी योग्य रितीने होईल तसेच अपेक्षित ध्येय प्राप्त होईल याची संपूर्ण जबाबदारी महावितरण कंपनीने पार पाडावी.

५. हा शासन निर्णय, आदिवासी विकास विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौ.संदर्भ क्र. ८०० दिनांक २८.०३.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०९१९१९४१४२४५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत /करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prashant Pundlik Badgeri

Digitally signed by Prashant Pundlik Badgeri
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=07ae22a8e7fa4047ce6ff816d85e77eec14db9926b325a140acf9b28bb990786, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundlik Badgeri
Date: 2019.09.19 19:48:54 +05'30'

(प्रशांत पुं.बडगेरी)
शासनाचे उप सचिव

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, विधानभवन, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव

७. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व मंत्रालयीन विभाग
११. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१२. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर
१४. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
१५. कोषागार अधिकारी, जिल्हा अहमदनगर
१६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१८. अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. कक्ष अधिकारी (व्यय-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. कार्यासन अधिकारी (का-३), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.